# निराधारांच्या हक्काच्या अनुदानासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचा मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा

चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वेळेवर व नियमित मिळावी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.मुनगंटीवार यांची मागणी

मानधनवाढीसाठी आ. मुनगंटीवार यांचा यापूर्वीही विधानसभेत आवाज; अर्थमंत्री असताना अनुदानवाढीसाठी पुढाकार

चंद्रपूर : निराधार, दिव्यांग, विधवा आणि वृद्धांच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असलेल्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे मानधन वाढविण्यासाठी यापूर्वी विधानसभेत आवाज उठवून, अर्थमंत्री असताना अनुदानवाढीसाठी पुढाकार घेणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आता चंद्रपूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना अनुदान वेळेवर मिळत नसल्याच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. ज्या अनुदानावर हजारो गरजू नागरिकांच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार आणि उदरनिर्वाह अवलंबून आहे, ती रक्कम वेळेवर मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अनुदान वितरणातील विलंबामुळे लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे मानधन लाभार्थ्यांना नियमितपणे आणि वेळेत मिळण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांच्या आर्थिक गरजांना हातभार लागावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. विधानसभेत निराधारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यापासून ते अर्थमंत्री म्हणून अनुदानवाढीसाठी पुढाकार घेण्यापर्यंत त्यांनी या घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. राज्याचे अर्थमंत्री असताना आ.मुनगंटीवार यांनी अनुदानाची रक्कम ६०० रुपयांवरून १,२०० रुपये केली. त्यानंतरही ही मदत अपुरी पडत असल्याची जाणीव ठेवून, मानधन १,२०० रुपयांवरून १,५०० रुपये करण्यासाठी त्यांनी विधानसभेत सातत्याने आवाज उठवला. निराधारांच्या आर्थिक गरजांची जाणीव ठेवून मानधनवाढीसाठी प्रयत्नशील राहिलेल्या आ. सुधीर मुनगंटीवार यांनी आता या लाभार्थ्यांना मंजूर अनुदानाची रक्कम वेळेवर आणि नियमित मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेची रक्कम नियमितपणे मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या योजनेतील अनुदान हे लाभार्थ्यांसाठी केवळ आर्थिक मदत नसून त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे अनुदान वितरणात होणारा विलंब टाळून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला निर्धारित वेळेत अनुदान मिळणे आवश्यक आहे.अनुदान वितरणात विलंब होण्यामागील तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचणी दूर करून लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी. तसेच भविष्यात अनुदान मिळण्यास विलंब होणार नाही, यासाठी संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

मानधनवाढीसाठी यापूर्वी केलेल्या पाठपुराव्याप्रमाणेच आता निराधार लाभार्थ्यांना अनुदान वेळेवर मिळावे, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. समाजातील सर्वाधिक गरजू घटकांना त्यांच्या हक्काची आर्थिक मदत नियमितपणे मिळावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 8919 / ऑक्टोबर / २०२६

दिनांक : १०.१०.२०२६

प्रति,

**मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस**
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई - ३२

वंदेमातरम् !

विषय: चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वेळेवर मिळत नसल्याच्या गंभीर तक्रारींबाबत तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित अनुदान वितरित करण्याबाबत.

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अनेक लाभार्थ्यांना मागील काही काळापासून अनुदानाची रक्कम नियमितपणे मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून, निराधार, दिव्यांग, विधवा, वृद्ध तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे.

सदर योजना ही समाजातील अत्यंत गरजू व्यक्तींना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून मिळणारे अनुदान अनेक लाभार्थ्यांसाठी औषधोपचार, अन्नधान्य, दैनंदिन गरजा आणि उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. अशा परिस्थितीत पात्र लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान न मिळणे ही चिंतेची बाब आहे.

विशेषतः, अनुदान वितरणात होणारा विलंब, प्रलंबित अर्ज, बँक खात्यांशी संबंधित अडचणी, तांत्रिक त्रुटी अथवा प्रशासकीय स्तरावरील दिरंगाई यांपैकी नेमकी कारणे कोणती आहेत, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या आर्थिक मदतीपासून वंचित राहावे लागू नये.



।। वृक्ष लावा, वृक्ष जगवा ।।
पत्ता :'भाग्यश्री' गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र) दूरध्वनी क्र.07172-252582 (O), 256069 (H) 9552799608 (W)

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

या पार्श्वभूमीवर आपण संबंधित विभागाला तातडीने निर्देश देऊन चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेऊन तात्काळ संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे मानधन वितरीत करण्यात यावे, अशी मी आपणास विनंती करीत आहे.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळवल्यास मी आपला आभारी राहीन.
योग्य सहकार्याची अपेक्षा
सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत-
१. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
२. मा. तहसीलदार तथा संजय गांधी निराधार योजना, तहसिल कार्यालय, चंद्रपूर जि. चंद्रपूर
३. श्री. हरीष शर्मा, रा. गणपती वार्ड साई अपार्टमेंट, बल्लारपूर जि. चंद्रपूर
४. श्रीमती संध्याताई गुरनुले, रा. जुना रंगमंच वार्ड नं. १५, मुल ता. मुल जि. चंत्रपूर
५. श्री. रामपाल सिंग, रा. पोलीस लाईनच्या मागे, चानमारी चौक, तुकूम, चंद्रपूर
६. श्री. प्रभाकर भोयर, रा. क्रीडा संकुलाजवळ, वार्ड नं. १४. मुल जि. चंद्रपूर
७. श्री. नंदकिशोर रणदिवे, रा. ताडाळा रोड, गणेश मंदिर मुल, जि. चंद्रपूर
८. श्री. चंदूजी मारगोनवार, रा. रेल्वे स्टेशन रोड, आशीर्वाद कॉलनी, वार्ड नं. १६, मुल जि. चंद्रपूर
९. श्री. राहुल संतोषवार, रा. आस्तीक चौक, पोंभुर्णा जि. चंद्रपूर
१०. श्री. गौतम निमगडे, रा. चिचपल्ली ता. जि. चंद्रपुर
११. सौ. इंदिरा रमेश पिपरे, मु. पो. मानोरा ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१२. श्री. सोमेश्वर पद्मगीरीवार, मु. पो. कोठारी ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर
१३. कु. अल्काताई श्रीनिवास आत्राम, मु. भिमणी पो. घाटकुळ ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर
१४. श्री. विनोद देशमुख, मु. पो. घाटकुळ ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर
१५. सौ. ज्योती परशुराम बुरांडे, मु. पो. देवाडा खुर्द ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर
१६. श्री. प्रविण नामदेवराव मोहुर्ले, रा. वार्ड नं. १, हेडगेवार नगर, सोमनाथ रोड, ता. मुल जि. चंद्रपूर
१६. श्री. हरिश ढवस, मु.पो. आष्टा ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर

H